# Year 2021-22

## Minutes of Meeting Alumni Association conducted on 5th May 2022

सी. पी. ॲन्ड बेरार महाविद्यालय
ॲलुमनी असोसिएशन
तुळशीबाग, महाल, नागपूर
C. P. & Berar Mahavidyalaya Alumni Association

| अध्यक्ष | कार्याध्यक्ष | सचिव |
|---|---|---|
| डॉ. माधुरी दालाळकर | श्री. अशोक ठाकरे | प्रा. विवेक अलोणी |

संदर्भ : दिनांक : 25/04/2022

**General Body Meeting**

**Notice**

All the Hon'ble member of Alumni Association of C. P. & Berar Education Society's College, Nagpur are requested to attend Annual General Meeting On 5th May 2022 at 9:30 am to discuss following agenda.

1) To confirm minutes of last meeting.
2) To Discuss about organize Students development program.
3) To Review activities taken during 2021-22
4) Any other items with Chairperson permission.

Place: Principal Chamber of C. P. & Berar E. S. College, Nagpur.

Date: 25.04.2022

Vivek Aloni
Secretary
Shri. Vivek D. Aloni

॥श्री॥

Page No.
Date

सी. पी. ॲण्ड बेरार महाविद्यालय माजी विद्यार्थी संघटनेची सर्वसाधारण सभा आज दि. ५ मे २०२२ रोजी सकाळी ८.३० वाजता मा. प्राचार्यांच्या कक्षात संपन्न झाली. या सभेला पुढील कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते.

(१) प्राचार्य डॉ. मिलिंद बारहाते

(२) डॉ. मधुरी दाताळकर

(3) श्री. अशोक ठाकरे

(४) श्री. प्रमोद भागडे

(५) श्री. अनिल देव

(६) श्री. विवेक अलोणी

(७) प्रा. अरविंद सोवनी - निमंत्रित -

(८) श्री. संजय कुळकुलेवार S. M. Kulkulewa

सभेत पुढील विषयांवर चर्चा करण्यात आली. सभेचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. मिलिंद बारहाते यांनी भूषविले.

Page No.
Date

सभेच्या प्रारंभी माजी विद्यार्थी संघटनेचे सचिव प्रा. विवेक अलोणी यांनी सभेचा उद्देश आणि भूमिका विशद केली.

त्यानंतर सभेचे अध्यक्ष डॉ. मिलिंद बारहाते यांनी सभेला मार्गदर्शन केले. आगामी सत्रामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने कोणते उपक्रम आणि कार्यक्रम राबविता येतील, याबाबत सर्व सदस्यांनी चर्चा करावी आणि काही सूचना कराव्या, असे आवाहन केले.

त्या आवाहनाला प्रतिसाद देत सर्वच सदस्यांनी चर्चेमध्ये उत्साहाने आणि सक्रीयपणे सहभाग घेतला. यामध्ये माजी विद्यार्थी संघटनेच्या अध्यक्षा डॉ. माधुरी दाताळकर यांनी अनेक सूचना केल्या. यावेळी बोलतांना त्यांनी सांगितले की 'विद्यार्थी' हा केंद्रबिंदू मानून कार्यक्रम आणि उपक्रम राबवावे. येत्या सत्रात म्हणजेच ऑगस्ट - २०२२ मध्ये माजी विद्यार्थी मेळावा घ्यावा, असे त्यांनी सूचविले. विद्यार्थ्यांसाठी रोजगाराभिमुख अशा लहान लहान कार्यशाळांचे आयोजन, विद्यार्थ्यांना आवश्यक असणाऱ्या शैक्षणिक साहित्याचे वाटप करणे, पुस्तकांचे वाटप करणे यासारख्या उपक्रमांची त्यांनी चर्चा केली.

याशिवाय दरवर्षी पदवी आणि पदव्युत्तर अंतीम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे

माजी विद्यार्थी संघटनेमध्ये पंजीकरण (Registration) करून त्यांना संघटनेचे सर्वसामान्य सदस्य करून घ्यावे. त्यासाठी अतिशय माफक अशी नोंदणी फी घेता येऊ शकेल. या फि मधून मिळालेल्या रकमेचा उपयोग विविध उपक्रमांसाठी करता येऊ शकेल, असेही त्यांनी सूचविले. या नोंदणीच्या वेळीच त्या विद्यार्थ्यांकडून एक 'प्रोग्रेशन रेकॉर्ड' तयार करून घ्यावा. यात त्याचे नाव, पत्ता, संपर्क क्रमांक, e-mail id, भविष्यात त्यांच्या काय योजना आहेत, त्याचे छंद, त्याचा कल कोणत्या क्षेत्रात काम करणार आहे इत्यादी माहिती जाणून घेण्यासाठी एक फॉर्म तयार करून, तो त्या संबंधित विद्यार्थ्यांकडून भरून घ्यावा. जेणेकरून विद्यार्थ्यांची अद्ययावत माहिती माजी विद्यार्थी संघटनेकडे उपलब्ध राहू शकेल, अशी मौलिक सूचना त्यांनी केली.

संघटनेचे अन्य सदस्य श्री. प्रमोद भागडे यांनी, ~~क्र~~ वस्तू खरेदीच्यावेळी ग्राहकांची दर्जा, गुणवत्ता, वजन, भेसळ इत्यादी बाबतीत होणाऱ्या फसवणुकीबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्यादृष्टीने व्याख्यानांचे आणि प्रात्यक्षिकांचे आयोजन करावे, अशी सूचना केली.

सदस्य श्री. अनिल देव यांनी ~~विद्यार्थ्या~~ विद्यार्थीनींसाठी 'पोरी जरा जपून चाल' याविषयी प्रा. विजया मारोतकर यांच्या व्याख्यानाचे आयोजन करावे, असे सूचविले. याशिवाय

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाच्यादृष्टीने अमोल पुसदकर यांचे व्याख्यान, हस्ताक्षर सुधार कार्यक्रम, ग्रीटींग कार्ड तयार करण्यासंबंधी कार्यशाळा, मोबाईलचा सुरक्षित वापर कसा करावा याबाबतीत व्याख्यानांचे आणि उपक्रमांचे आयोजन करावे, असे सूचविले.

त्यानंतर सभेचा समारोप करतांना मा. प्राचार्य डॉ. बारहाते यांनी, सध्या skill developmen(t)ला खूप महत्व प्राप्त झाले असल्याने विद्यार्थ्यांचा कौशल्य विकासाचे कार्यक्रम आयोजित करावे, असे सूचविले. उद्योजकतेचे कौशल्य विकसित करण्यासाठी, ज्या उद्योजकांनी शून्यातून विश्व उभे केले आणि यशस्वी उद्योजक म्हणून नावलौकिक प्राप्त केला आहे, अशा यशस्वी उद्योजकांची भाषणे विद्यार्थ्यांसमोर व्हावीत, जेणेकरून विद्यार्थी त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन 'उद्योजक' बनु शकतील.

वरील सर्व उपक्रमांच्या आणि कार्यक्रमांच्या आयोजनात सहकार्य करण्याचे आश्वासन सर्व उपस्थित सदस्यांनी दिले.

शेवटी सचिव प्रा. विवेक अलोणी यांनी मा. प्राचार्यांचे आणि सर्व उपस्थितांचे आभार मानले आणि सभा समाप्त झाली.